


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!




संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com

वर्ष २ रे | अंक : ६३७. वा | सोमवार | दि. २५ डिसेंबर २०२३ | पृष्ठ ८ | किंमत ३रुपये

# जिल्हा रुग्णालयातील भ्रष्टाचाराला फुटू लागला कंठ...

## डॉ. सचिन वासेकर एसीबीच्या जात्यात,बाकी भ्रष्टाचारी सुपात...

**जनसंचलन/ बुलढाणा**

गेल्या अनेक वर्षांपासून राजरोसपणे सुरू असलेल्या येथील जिल्हा रुग्णालयातील भ्रष्टाचाराला आता कंठ फुटू लागल्याचे दिसून येत आहे. वर्षानुवर्षांपासून अत्यंत गुपचूप पद्धतीने सुरू असलेल्या या भ्रष्टाचाराला आता स्त्री रूग्णालयाचे प्रमुख वैद्यकीय अधीक्षक डॉ. सचिन वासेकर एसीबीच्या जाळ्यात अडकल्यानंतर आता इतरही भ्रष्टाचारी अधिकारी सुपात असल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहेत. वासेकर तो गया, बाकी कब जाएंगे अशी चर्चा दबक्या आवाजात होत आहे. दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज गेल्या अनेक दिवसांपासून यासंदर्भात वृत्तमालिका प्रकाशित करीत आहे. जिल्हा रुग्णालयात बोकाळलेला संपूर्ण भ्रष्टाचार खणून काढल्याशिवाय शांत न बसता आपली मोहीम अशीच सुरू ठेवणार आहे. येथील जिल्हा रुग्णालय आज भ्रष्टाचाराचे एक प्रमुख केंद्र बनल्याचे आता स्पष्टपणे समोर आलेले आहे. जिल्हा रुग्णालयात अत्यंत वेगवेगळ्या पातळ्यांवर आणि गेल्या अनेक वर्षांपासून मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार बोकाळलेला आहे. कोरोना महामारीच्या आधीपासून सुरू असलेल्या या अनिर्बंध भ्रष्टाचाराने कोरोनाच्या काळात तर आपले सर्वोच्च शिखर गाठले होते. या ठिकाणी मोठ्या प्रमाणात औषधी व उपकरणांचा घोटाळा झाला. शिवाय येथील भांडार विभागातही भ्रष्टाचाराने कळस गाठला होता. जिल्हा रुग्णालयात अनेक प्रकारची औषधी, सामग्री, उपकरणे, स्टेशनरीची खरेदी कागदोपत्री तर व्हायची, परंतु यातील बरेचसे साहित्य हे रुग्णालयात पोहोचलेच नाही. या सामग्रीला नेमके कसे पाय फुटले आणि ती सामग्री कुठे चालत




गेली, याचा आजपर्यंत कुणालाही हिशेब सापडत नाही. या जिल्हा रुग्णालयात काम करून गेलेले आधीचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.सोनटक्के, डॉ. पंडित, डॉ.तडस यांच्यासह महाभ्रष्टाचारी रोखपाल पी. के. माळी, तसेच विद्यमान रोखपाल लाकडे यांच्यासह भ्रष्टाचारी अधिकाऱ्यांचे त्रिकुट, नियम मोडून खासगी रुग्णसेवा करणारे अनेक डॉक्टर, असे अनेक जण या ठिकाणी कार्यरत आहेत. जिल्हा रुग्णालयात गेल्या अनेक वर्षांपासून कार्यरत अधिकाऱ्यांच्या एका त्रिकुटाने या ठिकाणी भ्रष्टाचाराचे थैमान घातले होते. या त्रिकुटापैकीच एक म्हणजे सर्वगुण संपन्न डॉ. सचिन वासेकर. वासेकर हे दोन दिवसांपूर्वी लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळ्यात अडकले. एका कंत्राटी डॉक्टरकडून लाच स्वीकारताना त्यांना रंगेहात पकडण्यात आले. डॉक्टरांची ड्यूटी लावण्यावरून डॉ. वासेकर सतत पैशांची मागणी करीत होते. वासेकर यांनी येथील जिल्हा रुग्णालयात आणि स्त्री रुग्णालयात विविध पातळ्यांवर प्रचंड भ्रष्टाचार केलेला आहे. कोरोना महामारीच्या काळात तर त्यांच्या भ्रष्टाचाराचा प्रचंड असे धुमारे फुटले होते. त्यामुळे भ्रष्टाचाराचा चटावलेल्या त्रिकुटातील एक असलेले डॉ. वासेकर आता एसीबीच्या जाळ्यात अलगद अडकले. आज वासेकरांचा भ्रष्टाचारी प्रताप उघड झाला असला, तरी त्यांच्या भ्रष्टाचाराचे अफरातफरीचे अजून अनेक नमुने समोर यायचे बाकी आहेत. त्यांच्या या भ्रष्टाचारी कृष्णकृत्यांचे इत्थंभूत पुरावे आज दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजकडे प्राप्त झालेले आहेत. त्याचाही भंडाफोड आम्ही लवकरच करणार आहोत.एव्हढेच नाही तर जिल्हा रुग्णालयातील या भ्रष्टाचारी त्रिकुटापैकी आणखी दोन महाठगांच्या भ्रष्टाचारालाही नागडे करण्याच्या दृष्टीने दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज तयारी करीत आहे. जोपर्यंत जिल्हा रुग्णालयात बोकाळलेल्या भ्रष्टाचाऱ्याच्या बुंध्यावर घाव घालून हा भ्रष्टाचाराची विषारी वृक्ष नष्ट करीत नाही, तोपर्यंत दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज सातत्याने या विरोधात आवाज उठवणार आहे. तसेच या ठिकाणी कार्यरत भ्रष्टाचारी अधिकाऱ्यांवर जोपर्यंत कायद्याचा बडगा उगारला जात नाही, तोपर्यंत दैनिक जनसंचलन व सिटी न्यूज शांत बसणार नाही.

उर्वरित पान २ वर




रूग्ण सेवा हिच ईश्वर सेवा या नावाला गालबोट लावणारे सर्वगुण संपन्न डॉ सचिन पांडूरंग वासेकर यांना मलकापूर न्यायलयात हजर करण्यात आले होते.वासेकर यांना ४८ हजारांची लाच घेतांना रंगेहाथ पकडण्यात आले आहे.त्या प्रकरणी आज दि २४ डिसेंबर रोजी न्यायलयाने २६ डिसेंबर पर्यंत त्यांना पोलिस कस्टडी अर्थातच पिसीआर दिला आहे. ७२ तास पोलिस कस्टडी मिळालेल्या लाच प्रकरणातील डॉ सचिन वासेकरांवर जिल्हा सामान्य प्रशासन काय कार्यवाही करणार याकडे संपुर्ण जिल्हावासियांचे लक्ष लागलेले आहे.

आम्ही सुरू केलेल्या पोस्टमार्टम सत्रात अजून बरीच माहिती प्रकाशित करून उजेडात आणणारच व दोषींवर जो पर्यंत कारवाई होत नाही आमचा हा पोस्टमार्टम सत्र असाच सुरू राहणार

# आम्ही रस्त्यांची सफाई करतो, तिजोरीची नाही; मुख्यमंत्र्यांचा विरोधकांना टोला...

**वृत्तसंस्था/ठाणे**

आम्ही रस्त्यांची धुलाई करत आहोत, रस्त्यांची सफाई करत आ-होत. आम्ही तिजोरीची सफाई आणि धुलाई नाही केली, असा टोला मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शुक्रवारी ठाण्यात विरोधकांना लगावला. करोनामध्ये ज्या पद्धतीने जो भ्रष्टाचार झाला आहे, त्याचा पाढा मी अधिवेशनात वाचला आहे, असेही शिंदे म्हणाले. मुंबईतील माजी नगरसेवक हारुन खान आणि त्यांच्या पत्नी ज्योती खान यांनी शेकडो कार्यकर्त्यांसह जाताना शिवसेनेत (शिंदे गट) प्रवेश केला. ठाण्यातील किसननगर परिसरात हा पक्षप्रवेश पार पडला. यावेळी मुख्यमंत्री शिंदे यांनी विरोधकांवर टीकास्त्र सोडले. मी मुख्यमंत्री म्हणून रस्त्यावर उतरून काम करतो आहे. मुंबईतील रस्ते पाण्याने ज्या पद्धतीने धुतले जातात, तो प्रकल्प भविष्यात राज्यभर राबवणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री शिंदे यांनी केले.सरकारच्या कामावर विश्वास ठेवून आतापर्यंत ५०हून अधिक माजी नगरसेवकांनी शिव-सेनेत प्रवेश केला आहे. भविष्यात ही यादी खूप मोठी होणार आहे, असे शिंदे या प्रसंगी म्हणाले.



# अवैध रेतीची वाहतूक करताना दोन टिप्पर पकडले...

## देऊळगाव राजा येथील तहसीलदार व अंढेरा पोलीस स्टेशनचे ठाणेदार यांनी केली धडाकेबाज कारवाई...

**जनसंचलन/ देऊळगाव राजा**

तालुक्यातील खडकपूर्णा नदी पात्रातून अवैध रीत्या रेतीचा उपसा करून रेती वाहतूक करणारे दोन टिप्पर तहसिलदार यांनी गुप्त माहितीच्या आधारे पकडुन दंडात्मक कारवाई केली सविस्तर वृत्त असे की देऊळगाव मही येथील खडकपूर्णा प्रकल्पामधून अवैध रित्या उपसा करून दोन टिप्पर रेती वाहतूक करीत होते देऊळगाव राजा येथील तहसीलदार यांना गुप्त माहितीच्या आधारे त्यांनी वाकी खुर्द फाट्याजवळ गस्ती घालत दोन टिप्पर पकडले याची माहिती देऊळगाव मही येथील तलाठी संदीप दिलीप वायाळ यांना दिली त्यांनी त्वरित वकी खुर्द फाट्यावर येऊन टिप्पर चालक यांना त्यांच्या नावाची विचारणा केली त्यावेळेस शंकर विठ्ठल कांबळे राहणार भरोसा असे सांगितले टिप्पर




नंबर ३८ ०२८५ व दुसऱ्या टिप्पर चालकाचे नाव रामदास भास्कर परिहार राहणार चिखली असे असून २८ ७२७६ या क्रमांकाचे मालवाहक टिप्पर वाकी खुर्द फाट्याजवळ तहसीलदार धनमणे यांनी अडवलेले होते. एका टिप्पर मध्ये ४ बारास तसेच दुसऱ्या टिप्पर मध्ये सुद्धा ४ बरास रेती असल्याचे सिद्ध झाले. तहसीलदार यांनी अढेरा पोलीस स्टेशनला फोन करून अढेरा पोलीस स्टेशनचे ठाणेदार मा. पाटील साहेब पो का किशोर जाधव ब नं १६७१ पो का नितीन फुसे ब नं २६०४ सदर भरलेल्या टिप्पर चा पंचनामा करून पोलीस स्टेशनला घेऊन गेले दोन्ही टिप्पर किअं ४०,००,००० किंमत आहे. या टिप्पर चालकांवर पुढील कारवाई अंढेरा पोलीस स्टेशनचे ठाणेदार करीत आहे.

# पान १ वरून जिल्हा रुग्णालयातील भ्रष्टाचाराला...


भ्रष्टाचारविरोधातील आपली कणखर भूमिका दैनिक जनसंचलन सातत्याने कायम ठेवणार आहे. वासेकरांवर झालेली कारवाई केवळ हिमनगाचे टोक आहे. मात्र, याखाली प्रचंड प्रमाणात भ्रष्टाचार विस्तारलेला आहे. हा भ्रष्टाचार संपवणे हेच आमचे अंतिम लक्ष्य असेल. हि धडाकेबाज कारवाई पोलिस अधीक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो अमरावती परिक्षेत्र श्री मारूती जगताप, अप्पर पोलिस अधीक्षक ॲन्टी करप्शन ब्युरो अमरावती श्री देविदास घेवारे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस उपअधिक्षक श्रीमती शितल घोगरे, एएसआय शाम भांगे, पोहेकॉ विलास साखरे, प्रविण बैरागी,मो.रिजवान,राजू क्षीरसागर, पोना विनोद लोखंडे, जगदीश पवार,पोकॉ गौरव खत्री, शैलश सोनवणे,मपोकॉ स्वाती वाणी,चापोकॉ अर्शद खान ॲन्टी करप्शन ब्युरो बुलढाणा यांनी केली आहे.

अजून बरेच काही पुढील भागात..

# चोरी करण्याच्या उद्देशाने फिरणाऱ्या एकास अटक...

**जनसंचलन/ डोणगाव**

कराळवाडी शिवारात रात्रीच्या वेळी चोरी करण्याच्या उद्देशाने फिरणाऱ्या एकास डोणगाव पोलिसांनी २४ डिसेंबरच्या रात्री पेट्रोलिंग दरम्यान अटक केली डोणगाव येथे गत काही दिवसांपासून चोरीच्या घटनांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे त्यामुळे डोणगाव पोलिसांनी रात्रीची गस्त सुरू केली आहे २४ डिसेंबरच्या रात्री पोलिस गस्तीवर असताना पिंटू दिलीप शिंदे रा. धानोरी, ता. चिखली, जि. बुलडाणा हा कराळवाडी ता. मेहकर येथे एका झाडाच्या आडी अंधाराचा फायदा घेऊन लपलेला आढळला पोलिसांनी त्याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे पुढील तपास ठाणेदार अमरनाथ नागरे यांचे आदेशाने सफौ, गणेश डव्हळे करीत आहेत.




# ३६ कोटी रुपये किमतीच्या विकास कामाचा भव्य भूमिपूजन सोहळा संपन्न



**जनसंचलन /बुलढाणा**


विधानसभा मतदारसंघातील बुलढाणा तालुक्यातील खामगाव रोड ते खुद्दार शाळेपर्यंत सिमेंट कॉंक्रीट रस्ता बांधकाम करणे रुपये ६८ लक्ष. मौजे. सुंदरखेड येथे तारकॉलनीमध्ये बुद्धविहाराचे बांधकाम करणे १२ लक्ष रुपये सुंदरखेड माऊली पार्क येथे बुद्धविहाराचे बांधकाम करणे १२ लक्ष रुपये. या सर्व कामांसह विविध विकास कामांचा भव्य भूमिपूजन सोहळा आमदार संजय गायकवाड यांच्या शुभहस्ते संपन्न झाला. सदर कार्यक्रमासाठी युवानेते मृत्युंजय संजय गायकवाड, माजी जिल्हा परिषद सदस्य सविताताई गणेश बाहेकर,शिवसेनेचे जिल्हाप्रमुख ओमसिंग राजपूत, शिवसेना तालुकाप्रमुख धनंजय बारोटे, किसान सेना जिल्हाप्रमुख संदीप गायकवाड, वाहतूक सेना जिल्हाप्रमुख राजेश मुंगळे, शिवसेना महिला आघाडी तालुकाप्रमुख वर्षाताई तायडे, भाजपा तालुकाध्यक्ष मोहन पवार, युवासेना तालुकाप्रमुख श्रीकांत जाधव, शिवदुत तालुकाप्रमुख नितीन राजपूत, शिवसेना उपतालुका प्रमुख माणिकराव सावळे, अनिल जगताप, शिवसेना नेते प्रवीण जाधव, यांच्यासह शिवसेना,युवासेना,भाजपा, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे सर्व पदाधिकारी तसेच ग्रामपंचायतचे सरपंच,उपसरपंच,ग्रामपंचायत सदस्य तथा सर्व परिसरातील नागरिकांनी जास्तीत जास्त संख्येने उपस्थित रहावे.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784 Title Code-MAHMAR-51647 Email- jansanchlan@gmail.com

# आता मिटकॉनद्वारे शेतकऱ्यांना मिळणार कार्बन क्रेडिट...

## महोगनी कृषि-वानिकी लागवडीतून विश्वातील पहिला कार्बन क्रेडिट प्रकल्प

### बुलढाणा तालुक्यातील भादोला वाडी येथील अनिल जयराम उबरहांडे यांनी आपल्या १ एकर मध्ये ४४४ महोगनीचे वृक्ष लावले




**जनसंचलन/बुलढाणा**

पर्यावरण संतुलन अबाधित राखण्यासाठी मिटकॉन कन्सल्टन्सी अँड इंजिनीरिंग सर्व्हिसेस लिमिटेड, मिटकॉन नेचर बेस्ड सोल्युशन्स व महोगनी विश्व ॲग्रो लिमिटेडच्या माध्यमातून महोगनी लागवड केलेल्या शेतकऱ्यांना कार्बन क्रेडिटचा मोबदला मिळणार आहे. कृषी वनीकरण व पुनर्वनीकरण (Afforestation and Reforestation) प्रकल्पाला वेरा (VERRA) रजिस्ट्री अंतर्गत यशस्वीरीत्या प्रमाणित केले आहे. या यशाचे सर्वत्र ठिकाणावरून कौतुक होत आहे. महोगनी कृषि-वानिकी हा प्रकल्प सध्या महाराष्ट्र, मध्यप्रदेश, कर्नाटक, तेलंगणा आणि गुजरात राज्यांमध्ये तसेच बुलढाणा जिल्ह्यातील भादोला वाडी येथे मोठ्या प्रमाणात सुरू असून यापुढे शेतकऱ्यांना विविध पिकांद्वारे कार्बन क्रेडिट उपलब्ध होईल. मिटकॉनची कृषी वनीकरण पद्धती पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत शेतीच्या विकासासाठी साहाय्यभूत ठरते. शेतकरी बंधूंच्या सहकार्याने व्यावसायिक तत्वावर सहा हजार एकरवर महोगनी लागवड करण्यात आली आहे. मिटकॉनचा भारतातील महोगनी लागवड हा उपक्रम आंतरराष्ट्रीय स्वच्छ विकास यंत्रणा (CDM) कार्यपद्धती मानकांचे अनुपालन करतो आणि मिटकॉनने जागतिक वृक्ष आधारित कार्बन क्रेडिट मार्केटमध्ये सहभागी होऊन शेतीचा शाश्वत विकास व शेतकरी आर्थिक सक्षमीकरणाचा पर्याय उपलब्ध केला आहे. महोगनी लागवडीचे नियोजनासाठी पाण्याचा उत्तम निचरा होणारी जमीन असावी.रोपांची लागवड पद्धती हि एक एकर क्षेत्रासाठी ४४४ रोपे लागतील.लागवडीचे अंतर १० बाय १० फूट किंवा ८ बाय १२ फूट असावे सरासरी खड्ड्याची लांबी रूंदी व खोली १.५बाय१.५बाय१.५ फूटाची असावी.भारतातील लाकूड उद्योगातील संधी निर्यातक्षम लाकूड निर्मिती करून ग्रामीण भागात उद्योग व रोजगार निर्मिती करता यते.हे लाकूड इमारती,बांधकाम क्षेत्र,कागद निर्मिती,प्लायवूड, पॅनल्स,फर्निचर,हस्तकला आणि खेळणी यासह विविध प्रकारच्या उद्योगांसाठी लाकडाची आवश्यकता आहे.भारतातील२०२० मध्ये ५७ दशलक्ष घनमीटर लाकडाची मागणी होती तर २०३० मध्ये ९८ दशलक्ष घनमीटर असणार.कार्बन क्रेडिट कृषी वानिकीकडे कार्बन क्रेडिट मिळवून देणारे आर्थिक उत्पन्नाचे साधन म्हणून ओखलले जाते.कार्बन क्रेडिट प्रणालीची संकल्पना अधिकृतपणे क्योटी प्रोटोकॉलमध्ये १९९७ औपचारिकपणे मांडण्यात आली ज्यामध्ये उत्सर्जन कमी करण्यासाठी आर्थिक प्रोत्साहन दिले जाते.





#### अनिल उबरहांडे यांच्या १ एकर मध्ये ४४४ झाडांची लागवड

**महोगनी कृषी वानिकी लागवडीतून विश्वातील पहिला कार्बन क्रेडिट प्रकल्प सुरू झालेला आहे. या प्रकल्पात बुलढाणा जिल्ह्याने सुध्दा आपले योगदान दिलेले आहे.बुलढाणा तालुक्यातील भादोला वाडी येथे राहणारे श्री अनिल जयराम उबरहांडे यांनी त्यांच्या १ एकर शेतात महोगनीची एक नव्हे तर तब्बल ४४४ झाडांची लागवड केली आहे.या झाडांमुळे शेतकऱ्यांना तर बराच फायदा होणार आहे.**



# अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांवर पोलिसांची नजर...

## चार गुन्हे एलसीबीने केले उघड १३ आरोपींविरोधात कारवाई

**जनसंचलन / बुलढाणा**

नोव्हेंबर २०२१ मध्ये बुलढाणा जिल्ह्याच्या सिमेलगत मध्य प्रदेशातील पचोरी येथून झारखंड एटीएसने केलेल्या कारवाईनंतर बुलढाणा जिल्ह्यातही आर्म ॲक्ट अंतर्गत कारवाई करण्यास पोलीस प्रशासनाने प्राधान्य दिले आहे. दरम्यान गेल्या वर्षभरात एलसीबीने अवैधरित्या शस्त्र बाळगल्याप्रकरणी चार गुन्हे उघडकीस आणले असून १३ आरोपींविरोधात कारवाई केली आहे. या कारवायांमध्ये १५ लाख ९९ हजार ५०० रूपयांचा मुद्देमालही जप्त करण्यात आला आहे. जिल्ह्यात संग्रामपूर, जळगाव जामोद तालुक्यांमध्ये प्रामुख्याने देशी कट्टे मध्य प्रदेशातून आणून विक्रीचा व्यवसाय काही लोक करतात. त्यानुषंगाने अशांवर पोलीसांनी नजर ठेवली आहे. यासोबतच मेहकर तालुक्यातील शेंदला परिसरातील यापुर्वी असा प्रकार होत होता मात्र त्याला आता बऱ्यापैकी लगाम लागला आहे. २०२१ आणि २०२२ मध्ये टुनकी परिसरातील १४ देशी पिस्तुल व १६० जिवंत काडतूस झारखंड एटीएसने ताब्यात घेतले होते. त्यावेळेस देशातील अन्य राज्यातही एकाच वेळेस कारवाई करण्यात आली होती. हे गांभीर्य पाहता पोलीस प्रशासन अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांवर करडी नजर ठेवून आहेत. २०२१-२२ मध्ये टुनकीतील कारवाई सोबतच सोनेवाडी येथील एकास एनआयएच्या पथकाने ताब्यात घेत चौकशी केली होती त्यानंतर गोंधनापूर येथील एका जणासही एटीएसने कथीत स्तरावर दहशत वाद्यांशी संबंध असल्याच्या कारणावरून ताब्यात घेतले होते. या तीन घटनांमुळे त्यावेळी जिल्हा राष्ट्रीय तपास यंत्रणेच्या रडावर आला होता. या घटना पाहता जिल्ह्यात अवैध शस्त्र बाळगणाऱ्यांवर पोलीसांची करडी नजर असल्याचे समोर आले आहे. त्यानुषंगानेच एलसीबीने वर्षभरात १३ आरोपींविरोधात आर्म ॲक्ट अंतर्गत कारवाई केली आहे.




# जिल्हास्तरीय कराओके गायन स्पर्धेचे आयोजन...

**जनसंचलन / खामगाव**

गाना गाओ जिंदगी सजाओ व प्रेस क्लब खामगाव र.जि. क्र. ३२९/१९ एफ १८४३२ च्या संयुक्त विद्यमाने पत्रकार दिनानिमित्त ५ जानेवारी २४ रोजी स्थानिक कोल्हटकर स्मारक मंदिर (केला हिंदी हायस्कूलच्या मागे) येथे सकाळी १०वाजता केले आहे. बुलढाणा जिल्हास्तरीय कराओके गायन महोत्सवाचे (कराओके गीत गायन स्पर्धा) आयोजन करण्यात आले आहे. तरी स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांनी दि. ३० डिसेंबर २३ या कालावधीत आपले नाव, पत्ता व वय नोंदवावे. ही स्पर्धा दोन गटात होणार असून स्पर्धेत सहभागी होण्यासाठी ५ ते १६वर्षे वयोगटातील मुलांसाठी एंट्री फीस २०० रुपए असुन प्रथम पारितोषिक ५००१रू, द्वितीय पारितोषिक ३००१रू आणि तृतीय पारितोषिक २००१रू आहे. तसेच १७ वर्षापेक्षा जास्त वयाच्या लोकांसाठी खुला वर्ग आहे. ज्याची एंट्री फीस ३०० रुपए असुन ज्यामध्ये प्रथम पारितोषिक ५००१रू द्वितीय पारितोषिक ३००१रू आणि तृतीय पारितोषिक २००१रू देण्यात येईल. कार्यक्रमाला झी युवा टीव्हीचा युवा सिंगर एक नंबर सिंगिंग रिॲलिटी शो चे महाविजेते, स्टार प्रवाह वरील मी होणार सुपरस्टार आवाज कुणाचा... महाराष्ट्राचा चे फायनालिस्ट लोककलावंत शाहीर विक्रांतसिंह सज्जनसिंह राजपूत, सुप्रसिद्ध गायिका प्रज्ञा धांडे तथा सुप्रसिद्ध गायक सप्त खंजेरी वादक प्रबोधन सम्राट सत्यपाल महाराजांचे पुतणे पियूष पाल चिंचोळकर हे प्रमुख जजेस म्हणून लाभणार आहेत. सहभागींना कराओके गाणी गाण्यासाठी ३ मिनिटांचा कालावधी दिला जाईल. तज्ञ परीक्षकांद्वारे चाचणी केल्यानंतर, विजेत्या उमेदवारांची नावे जाहीर केली जातील आणि ६ जानेवारी २४ रोजी आयोजित पत्रकार दिन कार्यक्रमात पुरस्कार प्रदान केले जातील. इच्छुकांनी नाव नोंदणी व अधिक माहितीसाठी श्रद्धा सिसोदिया : ९३७०४४९०१(फक्त महिलांसाठी) संतोष गवई : ९८५०३६१६६१ (फक्त पुरुषांसाठी)तरी इच्छुकांनी सहभागी व्हावे असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# लोकसभेपूर्वी काँग्रेसमध्ये खांदेपालट, महाराष्ट्र काँग्रेसला मिळाले नवे प्रभारी...

वृत्तसंस्था/मुंबई

आगामी लोकसभा निवडणुका लक्षात घेता अखिल भारतीय काँग्रेस समितीकडून पक्षातील विविध राज्यांचे प्रभारी आणि इतर महत्वांच्या पदाची घोषणा शनिवारी केली. यात प्रामुख्याने महाराष्ट्राच्या प्रभारी पदाची धुरा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि माजी मंत्री रमेश चेन्निथला यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. तर त्याचबरोबर ज्येष्ठ नेते मोहन प्रकाश यांच्याकडे बिहारची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. याशिवाय दक्षिण मुंबईचे माजी खासदार मिलिंद देवरा यांच्याकडे महत्वाची जबाबदारी सोपविण्यात आली असून देवरा यांची नियुक्ती संयुक्त खजिनदारपदी करण्यात आली आहे. अखिल भारतीय काँग्रेस समितीचे महासचिव के.सी.वेणुगोपाल यांनी शनिवारी या नियुक्ता जाहीर केल्या. काँग्रेसचे महाराष्ट्राचे माजी प्रभारी एच.के.पाटील यांची वर्णी कर्नाटकच्या मंत्रिमंडळात लागल्यानंतर त्यांच्या जागी कोणाची नियुक्ती केली जाते. याबाबत गेल्या काही दिवसांपासून पक्षांतर्गत बरीच उत्सुकता लागून राहिली होती. या पदासाठी काँग्रेसच्या ज्येष्ठ नेत्यांमध्ये बरीच चढाओढ सुरु असतानाच शनिवारी पक्षाने महाराष्ट्राची जबाबदारी रमेश चेन्निथला यांच्याकडे सोपविली आहे. त्यांच्याशिवाय मोहन प्रकाश यांच्या खांद्यावर बिहारचे प्रभारीपदाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. तर मेघालय, मिझारोम आणि अरुणाचल प्रदेशची जबाबदारी डॉ. चेल्लाकुमार यांच्याकडे सोपविण्यात आली आहे. तर माणिकराव ठाकरे यांच्याकडे गोवा, दिव आणि दमण, दादरा नगर हवेलीची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. तर राजीव शुक्ला यांच्याकडे हिमाचल प्रदेश आणि चंदीगडची धुरा देण्यात आली आहे. सचिन पायलट यांच्याकडे छत्तीसगडची जबाबदारी देण्यात आली आहे. तर, प्रियांका गांधी यांच्याकडे सध्या कोणत्याही राज्याची जबाबदारी नसली तरी त्या पक्षाच्या सरचिटणीस म्हणून काम पाहतील.अखिल भारतीय काँग्रेस समितीने प्रभारींचे नावे जाहीर करताना इतरही नियुक्ता यावेळी जाहीर केल्या आहेत. यात प्रामुख्याने अजय माकन यांच्याकडे खजिनदारपदाची धुरा सोपविण्यात आली असून संयुक्त खजिनदार पदासाठी माजी खासदार मिलिंद देवरा आणि विजय सिंगला यांची नियुक्ती जाहीर केली आहे. त्याचवेळी पक्षाने महासचिव तारिक अन्वर, भक्ता चरण, हरिष चौधरी, रजनी पाटील आणि मनिष चत्राथ यांच्या बजाविलेल्या कामगिरीचे कौतुक केले आहे.



# मराठा आंदोलन आता मुंबईत, मनोज जरांगेंकडून बेमुदत उपोषणाची घोषणा...

वृत्तसंस्था/मुंबई

मराठा आरक्षणासाठी राज्य सरकारला तीन वेळा अवधी दिला. मात्र, सरकारने मराठा समाजास चर्चेत गुंतवून वेळकाढूपणा केला. त्यामुळे आता अंतिम लढ्यासाठी मराठ्यांनी तयार राहावे. राज्य सरकारने मुंबईत १८ तारखेपर्यंत जमावबंदी लागू केली आहे. त्यामुळे मी २० जानेवारीपासून मुंबईत आझाद मैदानावर बेमुदत उपोषण करणार आहे, असे मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आंदोलन करणारे मनोज जरांगे पाटील यांनी जाहीर केले. बीड येथील सभेत ते बोलत होते.

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील यांनी अंतरवाली सराटी येथून लढा उभारला. चर्चेनंतर आंदोलन मागे घेऊन, त्यांनी सुरुवातीला सरकारला ४० दिवसांचा वेळ दिला होता. जरांगे यांनी त्यासाठी २४ डिसेंबरची मुदत दिली होती. ही मुदत संपत आल्याने त्यांनी नव्या आंदोलनाची घोषणा केली. आंदोलनादरम्यान मला भेटण्यासाठी कोट्यवधी मराठा समाज मुंबईत धडकेल, असा एकप्रकारे इशाराच जरांगे यांनी सरकारला दिला. बीड येथील सभेपूर्वी जरांगे यांनी रॅली काढली. एवढ्या मोठ्या संख्येने जनता जमा झाली आहे. बीड जिल्ह्यातील मराठा वादळ पाहून विरोधकांना पळता



भुई झाल्याशिवाय राहणार नाही. कोणी म्हणते आमचे घर जाळले, हॉटेल जाळले; पण आजचा एवढा समुदाय पाहता आपण हे काम केले नसून, त्यांनी स्वतःच स्वत:ची घरे जाळली आहेत, असा आरोप जरांगे पाटील यांनी केला. जाळपोळप्रकरणी आमच्या निष्पाप मुलांना गोवण्याचे काम सरकारने केले. मराठ्यांना राज्यात शांतता हवी आहे. आज लाखोंच्या संख्येने आमचा मराठा समाज शांततेत शहरात गेला आणि रॅली काढून मैदानात आला. शांतताप्रिय लोक कुणाच्या घरावर जाऊ शकत नाहीत. येवल्याचं येडं आलं आणि त्यांनीच पाहुण्याचे हॉटेल जाळले, अशा शब्दांत जरांगे यांनी मंत्री छगन भुजबळ यांचे नाव न घेता टीका केली. सरकारकडे अजूनही दहा-पंधरा दिवस आहेत. आम्ही अंतरवाली सोडली व मुंबईत निघालो, की आमची-तुमची चर्चा बंद. मराठ्यांनी मुंबईकडे कूच केले, तर आम्ही आरक्षण घेतल्याशिवाय माघारी फिरणार नाही, असा इशारा जरांगे यांनी दिला.मराठा आरक्षणासंदर्भातील उपचारात्मक म्हणजेच क्युरेटिव्ह याचिका सर्वोच्च न्यायालयाने स्वीकारली असून, यामुळे मराठा समाजाला दिलासा मिळाला आहे. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड, न्या. भूषण गवई, संजय किशन कौल व संजीव खन्ना यांच्या खंडपीठाने २४ जानेवारी, २०२४ रोजी या प्रकरणावर विचार करण्याचा निर्णय घेतला आहे. यातील न्या. कौल सोमवार, २५ डिसेंबर रोजी निवृत्त होणार आहेत. ही क्युरेटिव्ह याचिका म्हणजे एकप्रकारे राज्य सरकारला शेवटची संधी आहे.

# काँग्रेसला विदर्भात धक्का सुनील केदार यांची आमदारकी रद्द...

वृत्तसंस्था/ नागपूर



काँग्रेसचे आमदार सुनील केदार यांची आमदारकी रद्द करण्यात आली आहे. नागपूर जिल्हा बँक घोटाळा प्रकरणात झालेल्या कारवाईनंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. नागपूर जिल्हा बँक घोटाळा प्रकरणात केदार दोषी आढळले होते. त्यामुळे त्यांना ५ वर्षांची शिक्षा झाली. त्यानंतर आता त्यांचं विधानसभा सदस्यत्व रद्द करण्यात आलं आहे. त्यामुळे काँग्रेसला विदर्भात मोठा धक्का बसला आहे.लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर आणि पक्षाच्या वर्धापनदिनाच्या महारॅलीच्या उंबरठ्यावर केदार यांना शिक्षा झाली. त्यामुळे काँग्रेसला धक्का बसला आहे. न्यायालयानं त्यांना ५ वर्षांची शिक्षा ठोठावली. आता त्यांचं विधानसभा सदस्यत्व रद्द झालं आहे. केदार यांची आमदारकी रद्द होण्याची शक्यता बळावल्यापासून भाजपनं मोर्चेबांधणीला सुरुवात केली.सुनील केदार यांची जिल्ह्यातील राजकारणावर चांगली पकड आहे. जिल्हा परिषद, नगरपरिषदांवर त्यांचा दबदबा आहे. राज्यात काँग्रेस पिछाडीवर जात असताना केदार यांनी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये सत्ता राखली. ग्रामीण भागावर त्यांचं वर्चस्व आहे. दांडगा जनसंपर्क आणि परिश्रम यांच्या जोरावर त्यांनी विरोधकांना अनेकदा मात दिली आहे. २०१४ मध्ये मोदी लाटेत जिल्ह्यात काँग्रेसचा सुपडा साफ होत असताना ते विजयी झाले होते. बाकी सगळ्या जागांवर काँग्रेस उमेदवारांचा पराभव झाला.सुनील केदार यांनी विधान परिषद निवडणुकीत भाजपला मोठा धक्का दिला. पदवीधर मतदारसंघात पाच दशकांपासून असलेलं भाजपचं वर्चस्व त्यांनी मोडून काढलं आणि काँग्रेससाठी जागा खेचून आणली. विधान परिषदेच्या नागपूर जिल्हा स्थानिक स्वराज्य मतदारसंघात त्यांनी ऐनवेळी भाजपच्या चंद्रशेखर बावनकुळेंविरोधातला उमेदवार बदलला आणि आव्हान उभं केलं. शिक्षक मतदारसंघातही त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. या वर्षीच्या सुरुवातीला महाविकास आघाडीची वज्रमूठ सभा झाली. त्या सभेचे ते संयोजक होते. भाजपला थेट अंगावर घेणारे नेते अशी त्यांची ओळख आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958

बॉक्स

वृत्तपत्र आणि चांगली माणसं लगेच कळत नाही त्याना वाचाव लागत

जिल्हावासियांचा बुलंद आवाज

# दैनिक निडर निर्भिड जनसंचलन

व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

## जाहिरात द्या व प्रचंड प्रतिसादाचा अनुभव घ्या...



**व्यवसायिक,प्रतिष्ठाने, Wanted, पाहिजेत, ऑफर, सेल इत्यादी**

| Size | 1 Month | 15 Day | 7 Day | Hight | Width |
|---|---|---|---|---|---|
| 8x8 cm | 5000/- | 3500/- | 2000/- | Hight 8 cm | Width 8 cm |
| 5x8 cm | 3500/- | 2200/- | 1500/- | Hight 5 cm | Width 8 cm |
| 5x8 cm | 3500/- | 2200/- | 1500/- | Hight 5 cm | Width 23 cm |

**एक दिवसाची जाहिरात: वाढदिवस शुभेच्छा, उद्घाटन, शुभारंभ, समारंभ, शुभविवाह इ.**

**One Day**

Full Page= 8000/-

1/2 Page= 5000/-

| Price | Hight | Width |
|---|---|---|
| 2600/- | Hight 12 cm | Width 12 cm |
| 1800/- | Hight 8 cm | Width 10 cm |
| 1300/- | Hight 8 cm | Width 8 cm |

T&C Apply

सुचना, नावात बदल, टी.सी. किंवा कागदपत्रे हरविली आहेत तसेच जाहीर प्रकटन इत्यादी केवळ ३५०/- रु.

- जाहिरातीचे मॅटर तयार नसल्यास डिझाईनसाठी अतिरिक्त २००/- रुपये चार्ज पडतील.
- पूर्ण रक्कम ॲडव्हान्स दिल्यास एकुण रकमेत ५ टक्के सुट
- प्रथम पानावरील जाहिरातीसाठी १० टक्के अतिरीक्त चार्ज पडेल

विशेष सूचना- आपल्या जाहिराती आमच्या सोशल मिडीया अकाउंटला ही नि:शुल्क झळकतील

न्यायालय तसेच धर्मदाय आयुक्तांच्या जाहीर नोटीस फक्त ५०० रुपये

अधिक माहितीसाठी संपर्क:

अजय राजगुरे-9922359674
ऑफिस नं.-9129582958

पत्ता- शिव शॉपिंग कॉम्प्लेक्स कारंजा चौक,बुलडाणा
Mail Id: jansanchlan@gmail.com